Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महिला हिंसाचार एक सामाजिक समस्या

**फड तिरुपती निवृत्तीराव**
संशोधक विद्यार्थी, पीपल्स कॉलेज नांदेड

**प्रस्तावना :-**

भारतीय सामाजिक विषमता हि लिंग, जात आणि धर्म या तीन घटकावर निर्माण झालेली आहे. महिला हिंसाचार हि भारतातील मोठी सामाजिक समस्या आहे. भारतासारख्या देशात अजूनही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. विकसित होळी कशात किंवा विकसनशील अशी कोणतीही लेबलं असलेले देश असून त्याठिकाणी स्त्रियांची परिस्थिती थोड्याबहुत प्रमाणात एकसारखीच असते. जम्मू-काश्मीरमधील कथुआ, उत्तर प्रदेश मधील उन्नाव, दिल्लीतील निर्भया, महाराष्ट्रातील कोपर्डी व नुकत्याच हैदराबाद येथे घडलेल्या सामूहिक बलात्काराच्या क्रूर पाशवि घटनेने संपूर्ण देश हादरवून टाकले आहे. या घटनेमुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर महिला हिंसाचार या घटकाचा आढावा या लेखात घेण्यात येत आहे व महिला संरक्षणासाठी विविध कायदे व धोरणे यांचा आढावा घेण्यात येत आहे.

**महिला हिंसाचार व प्रकार :-**

महिलांविषयीची समाजातील मानसिकता व त्यांना दिल्या जाणाऱ्या दुय्यमपनाच्या वागणुकीमुळे हिंसाचाराच्या यादीत त्यांचे स्थान अगदी वरचे येते. कुठल्याही व्यक्तीला एखाद्या विशिष्ट कृतीमुळे निर्माण झालेला त्रास किंवा इजा म्हणजे हिंसाचार होय.' महिला हिंसाचार हा फक्त मारहाण पर्यंतच मर्यादित नाही तर त्यामध्ये शारीरिक, भावनिक, आर्थिक, लैंगिक अत्याचार ही समावेश होतो. महिला हिंसाच्याराचे अनेक प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे

**१ शारीरिक हिंसा :-**

समोरच्या व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्याकरिता धमकी, शारीरिक इजा करणे, त्याचबरोबर एखाद्या वस्तूने मारणे, चिमटा काढणे चुकणे नखांनी ओरडणे लाथा-बुक्क्यांनी मारणे, यासारख्या कृतीचा या हिंसेत समावेश होतो.

**२ स्त्रीयांवर नियंत्रण व बंधने घालणे :-**

स्त्रियांना घरातून बाहेर पडण्यास विरोध, नोकरी करू न देणे, तिच्यावर सतत नियंत्रण ठेवणे, तिच्याकडील दागदागिने व पैशाचा चोरून वापर करणे, इत्यादी हिंसा प्रकार यात येत

**३ भावनिक जेव्हा मानसिक हिंसा :-**

एखाद्या गोष्टीवरून महिलेस टोचून बोलणे, केलेल्या कामात सतत नापसंती दर्शविणे, माहेरच्या लोकांबद्दल वारंवार वाईट बोलणे, छोट्या छोट्या गोष्टी वरून बोलणे सोडून देणे, यासारखा विषय येतो

**४ लैंगिक छळ :-**

स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध ठेवणे, इच्छेविरुद्धचा शारीरिक स्पर्श, बलात्कार, छेडछाड, कामाच्या ठिकाणचा लैंगिक त्रास, विनयभंगाची प्रकरणे, लैंगिक छळ हे या प्रकारात येतात.

**५ हुंड्यासाठी छळ :-** भारतात अजूनही हुंड्यासाठी स्त्रियांना अनेकदा त्रास सहन करावा लागतो. हुंद्यामध्ये पैशाची मागणी, वाहनाचा हट्ट, जमीन किंवा घरासाठी विचारणा केली जाते. इतकेच नव्हे

तर काही प्रसंगांमध्ये महिलांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याची उदाहरणे देखील आहेत.

**महिला हिंसाचार जागतिक स्तरावरील स्थिती :-**

एका बाजूला महिला समीक्षक करण्याचा उद्देश केला जात असताना पुढील माहिती महिलांच्या सुरक्षासंदर्भातील नाण्याची दुसरी बाजू स्पष्ट करते.

१. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' (WHO) च्या २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या अहवालानुसार, जगातीलजवळपास ३ महिलापैकी एका महिलेने (३५टक्के) तिच्या जीवन काळात जीवन साथी दाराकडून किंवा जीवन साथीदार व्यतिरिक्त व्यक्तीकडून शारीरिक किंवा लैंगिक अत्याचार अनुभवलेला असतो.

२. सर्वाधि हिंसाचार हा जीवन साथीदाराकडून करण्यात येतो. जगातील सुमारे एक तृतीयांश महिला नातेसंबंधात असताना मानसिक व शारीरिक हिंसेला बळी पडतात.

**३.** जगातील जवळपास ३८ टक्के महिलांच्या हत्या या पुरुष जीवनसाथी दाराकडून होत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**४.** सततच्या हिंसाचारामुळे स्त्रियांमध्ये नकारात्मक चे प्रमाण वाढीस लागते या, प्रकारामुळे स्त्रियांच्या शारीरिक मानसिक, लैंगिक पुनरुत्पादन आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

**५.** वर्ल्ड बँक (wb) च्या सप्टेंबर २०१९ मधील आकडेवारीनुसार, जिवलग साथीदाराव्यतिरिक्त दुसऱ्याकडून लैंगिक अत्याचार झालेल्या स्त्रियांचा आकडा सात टक्क्याच्या आसपास आहे. याच अहवालानुसार साधारण 200 दशलक्ष महिलांचे जननांग अंगच्छेदन (Female Genital Mutilation) केले जाते.

**६.** जगातील सुमारे ७५० दशलक्ष महिलांचा विवाह वयाची अठरा वर्षे होण्याअगोदरच होतो.

**७.** जगातील मानवी तस्करी (Human trafficking) होणाऱ्या पीडिताच्या प्रकरणांपैकी ७१ टक्के त्या महिला किंवा मुली असतात.

**भारतातील महिलांच्या सुरक्षिततेची स्थिती :-**

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण ब्युरो' च्या अहवालातील ठळक माहिती पुढीलप्रमाणे, २०१७ मध्ये महिलावरील गुन्ह्याचे सर्वाधिक प्रमाण उत्तर प्रदेश राज्यात होते. आय पी एस सी अंतर्गत महिला वरील गुन्ह्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

१ पती किंवा नातेवाईक यांच्या कडून अत्याचार: ३३.२ टक्के

२ विनयभंग करण्याच्या हेतूने अत्याचार: २७.३ टक्के

३ महिला अपहरण: २१ टक्के

४बलात्कार: १०.३ टक्के

बालकावर होणाऱ्या अत्याचाराचे वर्गीकरण

१.अपहरण: ४२ टक्के

२. बालात्कारासह पॉक्सो कायद्या अंतर्गत गुन्हे २५.३ टक्के

**केंद्र सरकारच्या महिला सुरक्षा उपाययोजना :-**

**संकटग्रस्त महिलांसाठी स्वाधार मुद्रा योजना :-**

जुन्या 2 योजनेची एकत्रित करून १ एप्रिल २०१६ पासून या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे.या योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये ३० महिलांची क्षमता असलेले स्वाधार ग्रह स्थापन केले

जाते. नैसर्गिक अपत्ती, तुरुंगातून सुटका, कौटुंबिक हिंसा, एच आय व्ही, वेश्याव्यवसाय यासारख्या प्रसंगातून बाहेर पडलेल्या महिलांना सन्मानाने जगावे या हेतू ही योजना आहे.

**उज्वला योजना :-**

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय ४ डिसेंबर,२०१७ रोजी योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. महिला व बालकांच्या अनैतिक व्यापार, व्यापारी शोषणापासून बचाव व प्रतिबंध, व्यापारातून सुटका झालेल्या खिडकीची पुनर्वसनया करता हि सर्वसमावेशक योजना कार्यरत आहे.

**सखी योजना :-**

महिला व बालविकास मंत्रालयाने, हिंसाचारग्रस्त महिलांना आधार देण्यासाठी मार्च २०१५ मध्ये योजना संमत केली. या योजनेअंतर्गत वन स्टॉप सेंटर मध्ये वैद्यकीय सेवा, समुपदेशन, पोलीस व नाईक सेवा, निवारा यासारख्या सुविधा पुरविल्या जातात.

**मोबाईल मध्ये पॉनिक (संकटमोचन) बटनाची सुविधा :-**

संकटातील महिलांना किंवा मुलींना आपल्या जवळच्या व्यक्ती किंवा पोलिसांना ताबडतोब परिस्थितीची माहिती देवा यावी यासाठी ही योजना आहे.

**निर्भया निधी :-**

भारतातील महिलांच्या संरक्षणासाठी हा निधी उभारण्यात आला आहे, 2013 सालच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या या निधीच्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षा व संरक्षणासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत.

**राष्ट्रीय महिला आयोग :-**

राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९० नुसार स्थापन करण्यात आलेली वैधानिक संस्था आहे. महिलांच्या संवैधानिक व कायदेशीर संरक्षणाचे पुनरावलोकन करण्यासाठी जानेवारी १९९२ मध्ये या या आयोगाची स्थापना करण्यात आली.

**कार्य :-**

महिलांच्या धोरणाविषयी सरकारला शिफारस करणे.महिलांशी संबंधित तक्रारीचे निवारण सुलभ करणे.धोरणनिर्मितीसाठीच्या उपचारात्मक कायदेशीर उपचाराची शिफारस करणे.

**प्रथम अध्यक्ष =** जयंती पटनाईक

सध प्रकाशक दर महिन्यात वृत्तपत्रिका राष्ट्र महिला (मराठी व इंग्रजी)

**महाराष्ट्र राज्य सरकारच्या महिला सुरक्षा योजना :-**

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने ऑनलाईन तक्रारीसाठी मोबाईल ॲप्लिकेशन, सिटीजन पोर्टल ॲप व तात्काळ मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिले आहेत. त्यासंबंधीची माहिती पुढील प्रमाणे,

**तेजस्विनी ॲप :-**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून महिलांच्या सुरक्षा व समीक्षा ना साठी 'तेजस्विनी' ऑनलाइन ॲप्लिकेशन सुरू करण्यात आले आहे. या ॲपच्या सहायाने महिला एखादी घटना किंवा गुन्हा घडल्यास तक्रार दाखल करू शकतात. यासोबतच महिला संदर्भातील विविध कायदे व नियम, हक्क आणि उपक्रमाविषयी ची माहिती ॲप्लिकेशन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**कोशिक ॲप :-**

नागपूर ग्रामीण पोलिसांनी हे ॲप तयार केली आहे. एप्लीकेशन द्वारे प्रत्येक रिक्षा चालकास

क्यूआर कोड(QR Code) दिला जातो. तो स्कॅन केल्यानंतर रिक्षाचालक व वाहनांची माहिती उपलब्ध होते. त्यामुळे त्वरित मोबाईल सोबत ऑटो रिक्षा सुरक्षेची हमी मिळते.

**हेल्पलाइन क्रमांक :-**

पुढील हेल्पलाइन नंबर क्रमांक डायल करून महिलांना मदत मिळवता येऊ शकते.

महिलांसाठी हेल्पलाईन नंबर क्रमांक =१०९१

संकटातील महिलांसाठी हेल्पलाईन क्रमांक =१०३

**दामिनी पथक :-**

महाराष्ट्रातील अनेकन जिल्ह्यांमध्ये 'दामिनी' पथक कार्यरत आहे. या पथकातील महिला पोलिसांकडून समाजातील गैरप्रकारांना आळा घालणे, महिलांची छेडछाड करणाऱ्यांना कारवाई करणे ,शहरातील शाळा महाविद्यालय परिसरात गस्त घातलेले इत्यादी कामे पार पडली जातात.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग :-**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर' राज्य महिला आयोगा' ची स्थापना १९९३ साली करण्यात आली आहे. ही वैज्ञानिक संस्था आहे. या आयोगास खटल्याची न्यायचौकशी करण्याचा दिवाणी न्यायालयाचा अधिकार आहे.

**कार्य :-**

समाजात महिलांचे स्थान व प्रतिष्ठा उंचावणे .महिलांवरील अन्याय शोधून तो दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवणे.योजना,विविध धोरणे,कायद्यातील उणीवा,दोष दूर करण्यासाठी सुधारण्याची शिफारस करणे.

**संयुक्त राष्ट्राचे अधिनियम :-**

संयुक्त राष्ट्राचे माजी महासचिव बान-की-मून यांच्या कार्यकाळात २००८ सालीही अधिनियम सुरू करण्यात आले आहे. या अधिनियमाचे वास व्यवस्थापन 'युएन विमेन' करण्यात येते. या बहुदुरिया अधिनियमाचा प्रमुख उद्देश जगातील महिला व मुलींना सोसाव्या लागणाऱ्या हिंसाचाराला प्रतिबंध करणे व तो संपविणे हा आहे. विविध देशाची सरकारे, नगरी समाज, महिला संघटना, तरुण, खाजगी क्षेत्र, प्रसारमाध्यमे यांच्यामार्फत २०३० सालापर्यंत महिला हिंसाचार संपविण्यासाठीच हे अधिनियम प्रयत्नशील आहे.

**आंतरराष्ट्रीय महिला हिंसाचार निर्मूलन दिन 25 नोव्हेंबर :-**

संयुक्त राष्ट्राच्या महा सभी कडून १९९९ साली या दिनाची स्थापना करण्यात आली आहे.महिला व मुलींच्या विरोधातील हिंसाचाराचे निर्मूलन तसेच याबद्दल जनजागृती करणे या या दिना मागील प्रमुख उद्देश आहे. हा दिवस ऑरेंज डे म्हणून ओळखला जातो.

**दिशा विधेयक 2019 :-**

बलात्काराच्या घटनांना चाप बसावा तसेच बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यात कठोर शिक्षा मिळावी याकरिता आंध्रप्रदेश राज्यात विधानसभेत महत्त्वाच्या दिशा विधेयकास मंजुरी देण्यात आली आहे. या नवीन कायद्यातील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे,

**विधेयकातील तरतुदी :-**

या विधेयकात बलात्कार व सामुहिक बलात्कारसारख्यागंभीर गुण्यातील आरोपिंना मृत्युदंडाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा गुन्ह्याच्या प्रकरणांना निकाल 21 दिवसाच्या आत देण्याची तरतूद या विधेयकात आहे.

सोशल मीडिया तसेच डिजिटल माध्यमातून महिलांना त्रास देणाऱ्या प्रथम गुन्ह्यासाठी दोन वर्षापर्यंत आणि व त्यापुढील गुण या साठी चार वर्षापर्यंत कारावासाच्या शिक्षेची तरतूद विधेयकात आहे.लहान मुलावर लैंगिक अत्याचारासाठी शिक्षा आजन्म कारावासापर्यंत करण्यात आली आहे. महिला आणि लहान मुलावर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्याची मंजुरी देण्यात आलेली

**महिला संरक्षणासाठी विविध कायदे व धरणे :-**

१.हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१
२.असभ्य प्रदर्शन प्रतिबंधक कायदा १९८६
३.गर्भ लिंग निदान प्रतिबंधक कायदा १९९४
४.कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणासाठी चा कायदा २००५
५.महिला कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ प्रतिबंध बंदी आणि निवारण कायदा २०१३
६.राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण २००१
पॉक्सो,कायदा २०१२
भारतीय दंड संहिता (IPC)१८६०
गुन्हेगारी प्रक्रिया संहिता (CrPC) १९७३

**मूल्यमापन :-**

महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे असायला हवेत याबद्दल दुमत नाही परंतु या सोबतच खरी गरज आहे ती म्हणजे समाजाची मानसिकता बदलण्याची. आजच्या घडीला अनेक क्षेत्रांमध्ये महिला त्यांच्या कार्यकर्तुत्वाचे मोहर उमटवीत असतानादेखील भारतीय समाजात महिला म्हणजे फक्त चूल आणि मूल फार, तर डोक्यात एक फूल हा विचार खोलवर रुजलेला दिसून येतो. या विचारात बगल देऊन महिलांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा स्वीकार करणे गरजेचे आहे. महिला हिंसाचार व बलात्कार सारख्या क्रूर घटनांना पायबंद घालण्यासाठी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती, चर्चासत्रे आयोजन, समुपदेशन, शालेय स्तरावर लैंगिक शिक्षण व मार्गदर्शन यास प्राध्यान्य द्यावयास हवे.

**संदर्भ सूची :-**

1.डॉ.रघुनाथ महाजन -कौटुंबिक हिंसाचार आणि महिला
2. Asim Sarode - Kautumbik Hinsachar Ani Kayada
3. ARCHANA MEDHEKAR -MARATHE- Mahilanche Kayde: Women Laws
4. Protection of Children from Sexual Offences Act 2012.
5. INTARNET
6. NEWS PAPER